वृत्तपत्राचे नांव :- [illegible]
वृत्तपत्र प्रकाशन ठिकाण :- मुंबई
वृत्तपत्र पान नं. :- १०
दिनांक :- ५/४/११
कटिंग नंबर :- २

# तयारी अतिरथरम् यज्ञाची

भारतातल्या अनेक वैदिक परंपरा लुप्तप्राय होत असल्या तरी त्या टिकवण्याचा काही लोकांचा प्रयत्न आहे. या साऱ्या परंपरा आणि कर्मकांड हे कालबाह्य झालेले आहे असे दावे वैज्ञानिकांनी केले असले तरी काही लोक अजूनही जीवननिष्ठा म्हणून या साऱ्या परंपरा जतन करण्याचा आपल्या परीने प्रयत्न करीत आहेत. अतिरथरम् यज्ञाची परंपरा अशीच आहे. केरळातील त्रिसूर जवळच्या पंजाल या गावामध्ये काही नंबुद्री ब्राह्मणांनी या परंपरेचा एक भाग म्हणून येत्या ४ एप्रिलपासून अतिरथरम् महोत्सवाचे आयोजन केले आहे. या महायज्ञाला अग्निकायन असेही नाव दिले जाते. हा महोत्सव १२ दिवस चालेल. वैदिक परंपरा आणि यज्ञांना शास्त्रीय आधार आहे आणि यज्ञाचे परिणाम शास्त्राने सिद्ध केलेले आहेत असे दावे करणाऱ्या लोकांची या यज्ञाला उपस्थिती राहणार आहे. या यज्ञाच्या आरोग्यावरील आणि मानसिकतेवरील परिणामांचे खूप वर्णन केले जाते आणि या यज्ञाचा शारीरिक तसेच मानसिक आरोग्यावर चांगलाच परिणाम होतो असे म्हटले जाते. आजच्या आधुनिक काळामध्ये ज्याला संशोधन म्हटले जाते त्या पद्धतीने हे दावे काही सिद्ध झालेले नाहीत. परंतु या निमित्ताने पुन्हा एकदा या दाव्यांची परीक्षा घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. अग्निकायन संस्काराची परंपरा तीन हजार वर्षांपूर्वीची आहे.

पंजाल या गावामध्ये या पूर्वीचा अग्निकायन संस्कार १९७५ साली पार पडला होता. त्यावेळी देशातले आणि परदेशातले अनेक शास्त्रज्ञ या यज्ञाला हजर राहिले होते. हॉलंडमधील वैदिक तत्वज्ञानाचे अभ्यासक फ्रिटस् स्टॉल हेही त्यावेळी उपस्थित होते. त्याशिवाय नंबुद्री समाजातील काही शास्त्रज्ञ यावेळी हजर होते. फ्रिटस् स्टॉल आताही उपस्थित राहणार आहेत. त्याशिवाय ते अमेरिकेतल्या अनेक शास्त्रज्ञांना आपल्या सोबत आणणार आहेत. स्टॉल यांचे वय आता ८१ वर्षे आहे आणि गेली ४० वर्षे ते या विषयावर काही अभ्यास करत आहेत. ४ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या या यज्ञामुळे हवेत काय बदल होतात, आसपासच्या जीवसृष्टीवर त्याचे काय परिणाम होतात याची निरीक्षणे या काळात केली जाणार



आहेत. महाराष्ट्रामध्येही असे काही प्रयोग झालेले आहेत. काँग्रेसचे दिवंगत नेते श्रीकांत जिचकार यांना या विषयात फार रस होता आणि त्यांनी नागपूरमध्ये काही यज्ञ करून त्या यज्ञांच्या परिणामांचे काही अहवाल तयार केले होते असे मागे सांगण्यात आले होते. मात्र त्या अहवालांचे पुढे काय झाले हे काही समजू शकले नाही. मात्र, अग्निहोत्र विधी करणारे हजारो लोक अशा विधींचा पर्यावरणावर योग्य परिणाम होतो अशी श्रद्धा बाळगून असतात. यज्ञयागाचे शास्त्र मानणारे कथित श्रद्धाळू आणि त्यांचे दावे फोल मानणारे शास्त्रज्ञ यांच्यात समन्वय कधी साधला जात नाही आणि यज्ञाचे खरे शास्त्रीय परिणाम काय आहेत याचा खरा छडा कधीच लागत नाही. असे असले तरी पंजाल या गावात तीन हजार वर्षांपासून ही परंपरा टिकवली गेली आहे आणि मध्यंतरीच्या काळात या परंपरांपासून दूर गेलेले याच नंबुद्री समाजातले अनेक तरुण पुन्हा या परंपरांकडे आकृष्ट होत आहेत असे सांगितले जाते.